विशेष विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
३ रा मजला, एच विंग, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई-४०० ०१०.
ई-मेल- acest005@gmail.com
दिनांक: २३/०३/२०१६

प्रति,
कर सहायक-२०१५
म.लो.आ. गुणवत्ता यादी क्र. ०१ ते ५९८

सविआ/आस्था-५/कर सहायक-२०१५/५९८/ब- ३५५ मुंबई दि. २३/०३/२०१६

विषय :- कर सहाय्यक पदासाठी उमेदवारांच्या शिफारशीबाबत.

संदर्भ :- १. शासनाचे (वित्त विभाग) दि. १०.०३.२०१६ रोजीचे पत्र.
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहीर केलेला कर सहाय्यक परिक्षा-२०१५ चा दि. ०२.०२.२०१६ रोजी जाहीर केलेला निकाल.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कर सहाय्यक परिक्षा-२०१५ या परिक्षेचा अंतिम निकाल दिनांक ०२.०२.२०१६ रोजी जाहीर करण्यात आला असून कर सहाय्यक पदी शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी शासनाच्या संदर्भ क्र. १. च्या पत्रान्वये विक्रीकर विभागास प्राप्त झालेली आहे. प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी उमेदवारांकडून परिशिष्ट - अ मध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करण्याबाबत शासनाने विक्रीकर विभागास कळविले आहे. शासनाच्या सुचना विचारात घेता कर सहाय्यक परिक्षा-२०१५ च्या शिफारस पात्र उमेदवारांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) शिफारसपात्र उमेदवारांनी खालील नमूद तक्त्यातील वेळापत्रकाप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी वरील नमूद पत्त्यावर हजर रहावे. तसेच सोबतच्या यादीतील (परिशिष्ट - ब) प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच सत्यापित प्रती (२ संच) सांक्षांकन नमुन्यासोबत (कार्यालयीन वेळेत) या कार्यालयात सादर कराव्या.

**A. फक्त महिला उमेदवारांकरीता**

| अ.क्र. | म.लो.आ. गुणवत्ता यादी क्र. | दिनांक | निर्धारित वेळ |
|---|---|---|---|
| १ | १ ते ३६९ | ०४.०४.२०१६ | सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |
| | ३७० ते ५९८ | | दुपारी २ ते सायंकाळी ५ पर्यंत |

**B. इतर उमेदवारांकरीता**

| अ.क्र. | म.लो.आ. गुणवत्ता यादी क्र. | दिनांक | निर्धारित वेळ |
|---|---|---|---|
| २ | १ ते १०६ | ०५.०४.२०१६ | सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |
| | १०७ ते २२२ | | दुपारी २ ते सायंकाळी ५ पर्यंत |
| ३ | २२५ ते ४७५ | ०६.०४.२०१६ | सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |
| | ४७६ ते ५९८ | | दुपारी २ ते सायंकाळी ५ पर्यंत |

२) शिफारस यादीतील सर्व उमेदवारांना साक्षांकन नमुना आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर साक्षांकन नमुना डाऊनलोड करुन घेण्याबाबत तसेच तो भरुन (३ प्रतिमध्ये) या कार्यालयामध्ये कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करण्याच्या सूचना उमेदवारांना देण्यात येत आहेत.

३) तसेच असेही स्पष्टपणे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे/ प्रमाणपत्रे विहीत मुदतीत या कार्यालयास सादर न केल्यास आपणास कर सहाय्यक पदावरील नियुक्ती स्विकारण्यात स्वारस्य नाही असे ग्राहय समजून आपला कर सहाय्यक पदावारील नियुक्तीचा हक्क रद्द समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४) जर उमेदवार परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केलेल्या वेळेनुसार कागदपत्रे पडताळणीच्या वेळी गैरहजर राहिल्यास अशा उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार पदस्थापनेबाबत पसंतीक्रम देण्याचा हक्क राहणार नाही. अशा उमेदवारांना परिच्छेद क्र. १ मधील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विक्रीकर विभागामध्ये रिक्त राहिलेल्या ठिकाणी विभागाच्या गरजेनुसार नेमणूक देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी विक्रीकर विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर Whats New या सदराखालील माहीती पहावी. उमेदवारांनी पुढील संपर्कासाठी आपला ई-मेल आयडी, दुरध्वनी क्र., भ्रमणध्वनी क्र. सांक्षांकन नमुन्यासोबत (Attestation form) या कार्यालयास सादर करावे. जर उमेदवारांना उपरोक्त नमूद सूचनांबाबत काही अडचण असल्यास ०२२-२३७६०३९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

25.3.16

सहाय्यक विक्रीकर आयुक्त (आस्था-५),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत: परिशिष्ट - अ व ब
(मा. विशेष विक्रीकर आयुक्त यांच्या मान्यतेने)

## परिशिष्ट - अ

१) प्रस्तूत पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले आहेत. त्यामुळे उमेदवारांची प्रमाणपत्रे आयोगाकडे उपलब्ध नाहीत. तसेच, कर सहाय्यक गट क ही एकाच टप्याची परीक्षा असून मुलाखत नसल्याने उमेदवारांच्या अर्हतेसंबंधाने प्रमाणपत्रांची पडताळणी आयोगाकडून करण्यात आलेली नाही. आयोगाने प्रस्तूत केलेला निकाल उमेदवारांच्या अर्जातील दाव्यानुसार त्यांची पात्रता विचारात घेऊन जाहीर केला आहे. यास्तव प्रस्तूत परीक्षेतील शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी सबंधित सर्व मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहेत.

२) प्रस्तुत परीक्षेतून शिफारसपात्र ठरलेले सर्व उमेदवार **विहित वयोमर्यादा, आवश्यक विहित शैक्षणिक अर्हता, जातीविषयक दावे / NCL प्रमाणपत्र, क्रिडाविषयक प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र इ. विहित तारखेस धारण करीत असल्याचे नियुक्तीपूर्वी** सक्षम प्राधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे तपासणी करुन त्यांना नियुक्ती देण्यात यावी. वयोमर्यादा- **दि. १ ऑगस्ट २०१५** रोजी

अ) अमागास उमेदवारांकरीता- किमान १८ वर्ष असावे व ३३ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

Age reference date (२.०८.१९८२ to ०१.०८.१९९७)

ब) मागासवर्गीय उमेदवारांकरीता - किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

Age reference date (२.०८.१९७७ to ०१.०८.१९९७)

क) अमागास व मागासवर्गीय खेळाडू उमेदवारांकरीता-किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

Age reference date (२.०८.१९७७ to ०१.०८.१९९७)

ड) अपंग उमेदवारांकरीता-किमान १८ वर्ष असावे व ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

Age reference date (२.०८.१९७० to ०१.०८.१९९७)

इ) माजी सैनिक उमेदवारांकरीता- सेवेचा एकूण कालावधी + ३ वर्षे.

३) शैक्षणिक अर्हता- सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दि. १२ मे २०१५ किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक आहे**. मराठी टंकलेखनाचा वेग ३० **शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि. १२ मे २०१५ किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक आहे.**

४) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र - **प्रस्तुत परीक्षेची जाहिरात दि. २२.०४.२०१५ रोजी विज्ञापित केलेली आहे. त्यामुळे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र जाहिरात विज्ञापित झालेल्या वित्तीय वर्षापूर्वीच्या (एप्रिल ते मार्च) वित्तीय वर्षातील म्हणजेच दि. ०१.०४.२०१४ ते ३१.०३.२०१५ या वित्तीय वर्षातील** असावे.

५) शिफारस करण्यात आलेल्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती / जमातीचे दावे समाजकल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात यावेत. तसेच महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५.०५.२००१ नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी संचालक, महिला व बालकल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे-१ यांचेकडून तपासून घेण्यात येणार आहेत.

६) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग तसेच अमागास (महिला) या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील (NCL) प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेऊन त्यांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात येणार आहेत.

७) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, पुणे यांची तपासण्याच्या अधिन राहून त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. यास्तव सदर उमेदवारांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि. ३०.०४.२००५ नुसार त्यांच्या नियुक्तीपूर्वी, संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून तपासून घेण्यात येणार आहेत.

८) अपंगांसाठी आरक्षित पदावर शिफारसपात्र ठरलेले उमेदवार प्रस्तुत नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करुन घेण्यात येणार आहे. तसेच त्यांची अपंगत्वाची प्रमाणपत्रे नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात येणार आहेत. शासनाच्या सा.आ.वि.शा.नि.क्र.अ प्रवि-२०१२/प्र.क्र२९७/आरोग्य-६, दि. ०६.१०.२०१२ अन्वये व्यक्ती (समान संधी) सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ नुसार, अपंगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार उमेदवारांनी **अपंगत्वाचे नवीन नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.** तसेच शासकीय रुगणालयात अपंगत्वाची तपासणी व मुल्यमापन मार्गदर्शक सूचनांनुसार होणे आवश्यक आहे.

९) माजी सैनिकाच्या आरक्षणाच्या दाव्याबाबत, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि. ०२.०९.१९८३ मधील तरतुदींनुसार माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या जागांबाबत सदर शासन निर्णय विचारात घेवून माजी सैनिक वर्गवारीचा दावा तपासणीच्या अधिन राहून उमेदवारांची शिफारस आयोगाने केली असून त्यांची अर्हता व पात्रता तपासून नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

23.3.16

**सहायक विक्रीकर आयुक्त, आस्था-५,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

# परिशिष्ट - ब

## कागदपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे

खालील प्रमाणपत्राच्या सत्यापित प्रती (२ संच) व कागदपत्राच्या मूळ प्रती उमेदवारांनी सादर कराव्यात.

१. अ) इयत्ता १०वी ची गुणपत्रिका/ प्रमाणपत्र

ब) इयत्ता १२वी ची गुणपत्रिका/ प्रमाणपत्र

क) पदवी परिक्षेची गुणपत्रिका/ प्रमाणपत्र

२. जन्मतारखेचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/ एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र)

३. विहीत नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र

४. दोन जबाबदार व्यक्तींकडून आपल्या चारित्र्याचे दाखले

५. महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहानंतर नावान बदल झाला असल्याचा दाखला (विवाह प्रबंधक/ राजपत्रित अधिकारी यांचा दाखला किंवा राजपत्राची प्रत)

६. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

७. मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र

८. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र (लागू असल्यास ०१.०४.१४ ते ३१.०३.१५ या वित्तीय वर्षातील)

९. खेळाबाबतचे प्रमाणपत्र (खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराच्या बाबतीत)

१०. शारिरीक दृष्टया अपंग असल्याबाबतचा दाखला (लागू असल्यास)

११. साक्षांकन नमून्याची प्रत.

१२. खुला- महिला राखीव उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२/मंत्रालय,मुंबई दि.२५.०५.२००१ मधील परिशिष्ट-२ मध्ये नमुद केलेली नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र मिळविण्याकरिताची सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती.

१३. माजी सैनिक असल्यास ओळखपत्र व इतर वैध पुरावे.

(12)
23.2.16

सहाय्यक विक्रीकर आयुक्त (आस्था-५),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.